# भोकर पोलिसांनी जप्त केल्या चोरी गेलेल्या १७ दुचाकी!



भोकर, दि. १४ : भोकरसह अन्य ठिकाणाहून चोरी गेलेल्या ८ लाख ७० हजार रुपयांच्या १७ दुचाकी जप्त करत एका चोरट्याला पोलिसांनी अटक केली.

भोकर तालुक्यातील दिवशी (बु.) येथील विजय सोनकांबळे व नवीन गुद्देवाड हे दोघे तेलंगणा राज्य व भोकर पोलीस स्थानक हद्दीतून दुचाकी चोरी करून विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यावरून यातील विजय सोनकांबळे या आरोपीस ताब्यात घेऊन अधिक ▪ पान २ वर

दै. प्रजावाणी

## भोकर पोलिसांनी जप्त केल्या...

चौकशी केली असता आरोपीने मोटर सायकली चोरून विकत असल्याची कबुली दिली. यानुसार भोकर पोलिसांनी गु. र.नं.४१३/२३ भा. दं. वि. ३७९ नुसार गुन्हा दाखल करून तपास केला.

या चोरट्याने तामसा येथून एक, भोकर पोलीस स्थानक हद्दीतून दोन तसेच नजीकच्या तेलंगाना राज्यातून दुचाकी चोरून मजूरवाडी तामसा येथे विक्री केल्याची कबुली दिली. या चोरी प्रकरणात पोलिसांनी एका आरोपीस अटक केली आहे तर दुसरा आरोपी फरार आहे. या प्रकरणांचा तपास सुरू असून आणखीन चोरीच्या दुचाकी मिळून येण्याची शक्यता पोलीसांनी वर्तवली आहे. अटक केलेल्या आरोपीला १३ डिसेंबर रोजी न्यायालयासमोर हजर केले असता चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. सदरील कार्यवाही पोलीस निरीक्षक नानासाहेब उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक दिगंबर पाटील, विकास आडे, पोलिस अंमलदार दिलीप जाधव, नामदेव जाधव, परमेश्वर कळणे, मोईन सय्यद, गुरुदास आरेवार यांच्या पथकाने केली.